# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**विदर्भ मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील विकास निधी वाटपाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत केलेली शिफारस**

**(१) १३१ (११-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील विकास निधी वाटपाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात यावी अशी शिफारस विदर्भ वैधानिक विकास महामंडळाने केली असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी वाटपाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याच्या प्रमुख शिफारशी कोणत्या असून सदरहू शिफारशीवर अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२५-०६-२०२०) :** (१) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळासंदर्भात मा. राज्यपाल महोदयांकडून आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता कार्यक्रमावरील खर्चा अंतर्गत उपलब्ध विकास निधी वाटपाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणताही प्रस्ताव विदर्भ विकास मंडळाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संतवाडी व निमसेमळा (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील पाझर तलावातून अवैध उत्खनन केल्याबाबत

**(२) ७६५ (२७-०३-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संतवाडी व निमसेमळा (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील पाझर तलावातून व इतर जमिनीतून श्री.संतोष निवृत्ती पाडेकर व इतर यांनी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने सन २०१० पासून अनेकदा मुरुम, वाळु, दगड इत्यादी गौण खनिजांचे विनापरवाना उत्खनन करुन विक्री केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सौ.स्मिता ज्ञानेश्वर पाडेकर रा.संतवाडी पो.आळे (ता.जुन्नर, जि.पुणे) यांनी मा.ग्रामविकास मंत्री, सचिव, ग्रामविकास विभाग तसेच जिल्हाधिकारी, पुणे व तहसिलदार, जुन्नर यांच्याकडे गत दोन वर्षापासून निवेदन दिले असून सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाने दिलेले आहे, हे ही खरे आहे काय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गौण खनिजांचे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर तसेच त्यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०९-२०२०) :** (१), (२), (३) व (४) मौजे संतवाडी व निमसेमळा, ता.जुन्नर, जि.पुणे येथील पाझर तलावातून व इतर जमिनीतून विनापरवाना गौण खनिजाची चोरी होत असल्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे व जिल्हाधिकारी पुणे, तहसिलदार, जुन्नर यांच्याकडे माहे मार्च व एप्रिल,२०१८ मध्ये तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उत्खनन झालेल्या ठिकाणची पाहणी करुन अवैधरित्या उत्खनन केलेल्या गौण खनिजाची ई.टी.एस.मशीनद्वारे मोजणी करण्यात आली आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या संबंधितास तहसिलदार, जुन्नर यांनी वेळोवेळी नोटीस बजावून लेखी खुलासा मागविला आहे. संबंधितांकडून प्राप्त लेखी खुलासा अमान्य करुन तहसिलदार, जुन्नर यांनी दि.२८/१/२०२० रोजी संबंधितास ११३३५.२७ ब्रास माती व मुरुमाच्या अनधिकृत उत्खननाप्रकरणी रु.३,६४,६५,५६५/- इतक्या दंडात्मक रक्कमेचा आदेश पारीत केला आहे.

सदर दंडात्मक रक्कमेच्या वसूलीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ च्या तरतूदीनुसार तहसिलदार, जुन्नर यांनी दि.२६/५/२०२० रोजी नमुना नं.१ ची नोटीस संबंधितास बजावण्यात आली असून रक्कम वसूलीची कार्यवाही तहसिलदार, जुन्नर यांचेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

**राज्यातील वाळू घाटांचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(३) १३८२ (२२-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तालुकास्तरीय तांत्रिक उपसमित्यांकडून नदी-नाल्यांमधील वाळू घाटांचे सर्वेक्षण अद्यापही सुरु करण्यात आले नसल्याची बाब दिनांक ७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्वेक्षण प्रलंबित असल्याने वाळू घाटांच्या लिलावाची प्रक्रिया प्रलंबित असून त्यामुळे लिलाव न झालेल्या वाळू घाटांमध्ये वाळूचे अवैध उत्खनन आणि अवैध वाहतुक मोठया प्रमाणात सुरु असल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुकास्तरीय तांत्रिक उपसमित्यांकडून वाळू घाटांचे सर्वेक्षण केव्हा सुरु होणार आणि वाळू घाटांच्या लिलावाची प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार याबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून तालुकास्तरीय तांत्रिक उपसमित्यांकडून नदी-नाल्यांमधील वाळू घाटांचे तातडीने सर्वेक्षण करून वाळू घाटांचे लिलाव करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०९-२०२०) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) राज्यातील वाळूघाटातून तसेच नदीनाल्यातून वाळूच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक तसेच ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल इ. यांचे ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर पथक/समितीमार्फत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(३) व (४) सन २०२०-२१ मध्ये राज्यातील लिलावात काढावयाच्या वाळूघाटांसाठी तांत्रिक उपसमित्यांकडून वाळू घाटांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येवून जनसुनावणी घेण्यात आली आहे. तसेच पर्यावरण अनुमतीसाठी काही जिल्ह्यातील वाळूघाटांचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीकडे सादर करण्यात आले आहेत, तर काही जिल्ह्यातील वाळूघाटांचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीकडे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावित वाळूघाटांना पर्यावरण अनुमती प्राप्त होताच वाळूघाटांची लिलाव प्रक्रिया करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील गड व किल्ले यांचे नियमित विकसित करण्याबाबत

**(४) २१७६ (१३-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनातर्फे महाराष्ट्रातील ऐतिहासिक सांस्कृतिक ठेवा असलेले गड व किल्ले यांची नियमित जतन, दुरुस्ती व विकास होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ऐतिहासिक सांस्कृतिक ठेवा असलेले गड व किल्ले यांची नियमित जतन, दुरुस्ती व विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२४-०८-२०२०) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सन २०१५ पासून २८ किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाची महत्वकांक्षी योजना हाती घेतली आहे. सदर २८ किल्ल्यांच्या जतन दुरूस्तीकरीता एकूण रू.१३४.८८ कोटी इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अंगणवाडयांना इमारती नसल्याबाबत

**(५) ३२३८ (१३-०४-२०२०). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात ४४० अंगणवाडी केंद्रे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील भेंडा खुर्द (अंगणवाडी क्र.३८) व नेवासा खुर्द (वार्ड क्र.७, अंगणवाडी क्र.३२८) या अंगणवाडयासह अन्य अंगणवाडयांना इमारत नसल्याने गेल्या १० वर्षापासून या अंगणवाडयातील मुलांना झाडाखाली वा उघडयावर बसवून (opan space) शिकविले जात असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी शासनाकडून लाखो रुपये खर्च होऊनही अंगणवाडी क्र.३८ व ३२८ या अंगणवाडयांसाठी इमारती न बांधण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०९-२०२०) :** (१) नेवासा तालुक्यात ३८६ नियमित अंगणवाडी केंद्र व ५५ मिनी अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

नेवासा तालुक्यातील भेंडा खुर्द येथील अंगणवाडी केंद्र क्र.३८ ही मिनी अंगणवाडी व नेवासा खुर्द वार्ड क्र.७, अंगणवाडी क्र.३२८ ही नियमित अंगणवाडी असून त्या झाडाखाली भरत नसून स्थानिकांनी मोफत उपलब्ध करुन दिलेल्या जागेत ही अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत.

(३), (४) व (५) अंगणवाडी क्र.३८ व ३२८ या अंगणवाडयांच्या इमारती बांधण्यासाठी शासकीय किंवा इतर स्त्रोताकडून जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधित जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबईत रात्रीची पाळणाघरे सुरु करण्याबाबत**

**(६) ३७९८ (१३-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील आयटी बहुल शहरात काम करणाऱ्या महिलांसाठी रात्रीची पाळणा घरे सुरु करण्यात आली त्यात मुंबईत ओव्हर द मून अशा काही सामाजिक संस्थांतर्फे रात्री सदर पाळणाघरे सुरु करण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाळणाघरात रात्रपाळीसाठी कर्मचारी वर्ग, तसेच मुलाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था, मुलांना झोपण्यासाठी गादी,उश्या,पांघरुण, मुलांसाठी रात्री वैद्यकीय सुविधा अशी सर्व व्यवस्था पाळणाघरांनी करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रीची पाळणाघरे सर्व सोईंनी सज्ज असतील तरच २४ तास चालू राहतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०९-२०२०) :** (१) नाही.

शासनाने रात्रीच्या पाळणाघरांना मान्यता दिलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चपळगाव श्री. स्वामी समर्थ इंजिनिअर्स आणि एसडीपीएल पुणे या कंपन्यांना अतिरिक्त उपसा करण्यास परवानगी दिल्याबाबत**

**(७) ४४८५ (२७-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चपळगाव शेतकरी पांच यांनी प्रत्यक्षात अडीच हजार ब्रास उपसा करण्यासाठीचा अहवाल दिला असून अधिकाऱ्याच्या अहवालाप्रमाणे अडीच हजार ब्रास मुरूम उपसा करण्यास मंजुरी देणे आवश्यक होते, हे खरे आहे काय,

(२) असलास, विभागाने श्री. स्वामी समर्थ इंजिनिअर्स आणि एसडीपीएल पुणे या कंपनीला मंजुरी देऊन जिल्हाधिकारी यांनी ठेकेदारावर मेहरबानी केल्याचे दिसुन येत असून मंडळ अधिकारी व शेतकऱ्यांची मान्यता नसताना ४ हजार ब्रास उपसा करण्यास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनामार्फत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०९-२०२०) :** (१), (२), व (३) अक्कलकोट ते नळदुर्ग या रस्त्याचे बांधकामाचे कंत्राट श्री.स्वामी समर्थ इंजिनिअर्स आणि एस.डी.पी.एल.पुणे यांना मिळाले आहे. शेतकऱ्याच्या संमतीनुसार संबंधित कंत्राटदार यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडे विहित मार्गाने ४००० ब्रास मुरुम खाजगी जमिनीतून उत्खननास परवानगी देण्याबाबतचा अर्ज सादर केला आहे. त्यानुसार ४००० ब्रास मुरुमाच्या उत्खननाकरीता आवश्यक ते स्वामीत्वधन आगाऊ शासन भरणा करुन सदर कंत्राटदार कंपनीस उत्खननाकरीता परवानगी देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

---

**औसा (जि.लातूर) येथील विधानसभा मतदार संघातील**
**अंगणवाडी केंद्रांना इमारती बांधुन देण्याबाबत**

**(८) ५०७१ (२२-०३-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदार संघात जवळपास ५१ अंगणवाडी वर्गास इमारती नसल्याने सदरील अंगणवाडी वर्ग खाजगी जागेत भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने सर्व अंगणवाडी वर्गास इमारत बांधकाम मंजूर करण्याबाबत आवश्यकती तरतूद जिल्हा वार्षिक योजना निधीत करण्याबाबत औसा तहसील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मागणी केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औसा विधानसभा मतदार संघात ऐकून किती अंगणवाडी वर्ग असून त्यापैकी किती अंगणवाडी वर्गास इमारत नाही व सदरील अंगणवाडी वर्गास इमारत बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०९-२०२०) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) औसा विधानसभा मतदार संघात ५०२ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित असून ३९१ अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती आहेत. उर्वरित अंगणवाडी केंद्र ही ग्रामपंचायत इमारतीत, समाजमंदिर, सेविका मदतनीस यांच्या घरी, मंगल कार्यालयात व इतर ठिकाणी

भरतात. या अंगणवाडयांपैकी २९ ठिकाणी इमारती बांधण्यासाठी मोकळया जागा उपलब्ध झाल्या आहेत. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून सदरील बांधकामे करण्यात येणार आहेत.

---

**ठाणे जिल्ह्यातील ७२ अंगणवाड्या इमारती धोकादायक स्थितीत असल्याबाबत**

**(९) ५७०१ (१३-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ७२ अंगणवाड्या इमारती धोकादायक असून, त्यामुळे जिवीतहानी होण्याची शक्यता असल्याचे दिनांक १० जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या अंगणवाड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) ठाणे जिल्ह्यात १५९६ अंगणवाड्या असून १०७९ ठिकाणी स्वतंत्र इमारती आहेत.यापैकी ४९ इमारती धोकादायक आढळून आलेल्या आहेत. त्यापैकी ४३ अंगणवाडी इमारतीचा निर्लेखनाच्या प्रस्तावास अधिक्षक अभियंता यांची मान्यता घेऊन नवीन २६ इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. या अंगणवाड्या सदरील निर्लेखित जागेत भरविण्यात येत नसून इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर (जि.जळगांव) शहरातील ऐतिहासिक वेस (दगडी दरवाजा)**
**कोसळलेल्या बुरुज दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबत**

**(१०) ५९६५ (२५-०३-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर शहरातील (जि.जळगांव) ऐतिहासिक वेस (दगडी दरवाजा) याचा बुरुज संततधार पावसामुळे कोसळल्याची दुर्घटना दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक वेस (दगडी दरवाजा) बुरुज कोसळण्यापूर्वी या दरवाज्यास तडे गेल्याचेही त्यापूर्वी निदर्शनास आले असताना वेळीच दुरुस्ती न केल्यामुळे भरपावसात दगडी दरवाजाचा बुरुज कोसळला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ऐतिहासिक वेस (दगडी दरवाजा) कोसळण्याची दुर्घटना घडली असताना कोणतीही दुरुस्ती न करता गेल्या ४ महिन्यांपासून त्या दगडी दरवाजा शेजारी मुरुमाच्या गोण्या ठेवून रस्ता वाहतूक सुरु करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऐतिहासिक वेस (दगडी दरवाजा) दोन्ही बुरुजाचे सर्वेक्षण करुन दुरुस्तीसाठी रू.१.६० कोटी इतक्या रकेमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले , हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने वेसीचे जतन संवर्धन करण्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२४-०८-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

(५) महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजने अंतर्गत अंमळनेर वेस ही अमळनेर नगरपरिषद, अमळनेर, जि.जळगाव यांना दि. २६ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये संगोपनार्थ देण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जाफ्राबाद (ता.भोकरदन, जि.जालना) येथील बस आगाराच्या अनेक बसेसची झालेली दूरवस्था**

**(११) ६१९९ (१०-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफ्राबाद (ता.भोकरदन, जि.जालना) येथील बस आगाराच्या अनेक बसेसची दूरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाफ्राबाद बस आगारातील बस क्र-MH२०डी- ९७४१ व बस क्र-MH२०BL ३७९६ या बसेस नियमित टेंभुर्णी-जालना रोज ये-जा करीत असून या बसेसच्या खिडक्यांच्या काचा तुटल्या असल्याने प्रवाशांना थंडी- वाऱ्याचा त्रास नियमित सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जाफ्राबाद आगारातील सर्वच बसेस जुन्या झाल्या असून मोडकळीस आल्या आहेत या बसेसमध्ये सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भोकरदन येथील दोन्ही बस आगारातील सर्व बसेस अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्तम सोयीसुविधा युक्त करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०८-२०२०) :** (१) दि.३० जानेवारी, २०२० रोजीच्या दैनिक लोकमत मध्ये जाफ्राबाद आगारातील बसेसची दुरवस्था झाल्याबाबतचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.
(२), (३) व (४) जाफ्राबाद आगारातील बस क्र.एमएच २० बीएल-३७९६ ही बस सुस्थितीत आहे. बस क्र.एमएच २० डी-९७४१ या बसची खिडकी निघाल्याचे निदर्शनास आल्याने त्याच दिवशी खिडकीची दुरुस्ती करण्यात आली आहे.

जाफ्राबाद आगाराला नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाची, सोयीसुविधायुक्त भाडेतत्वावरील २ शिवशाही वाहने ऑगस्ट, २०१९ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. नवीन वाहने जसजशी उपलब्ध होतील. तसतशी नवीन वाहने आगारास उपलब्ध करुन देण्याचे नियोजन केलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात चालक व वाहकांच्या मनमानीमुळे एसटीची हात दाखवा बस थांबवा योजना अपयशी ठरल्याबाबत**

**(१२) ६४०० (१०-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात चालक व वाहकाच्या मनमानीमुळे एसटीची हात दाखवा बस थांबवा योजना नावा पुरतीच ठरली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे प्रवासी त्रस्त झाले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार चौकशीच्या अनुषंगाने एसटीचा हा उपक्रम यशस्वी व्हावा यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०८-२०२०) :** (१) हात दाखवा बस थांबवा ही योजना २०१३ पासून बंद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी जास्त प्रवासी संख्या असलेल्या मार्गावर ठराविक वारंवारीतेने शटल वाहतूकीची नियते सुरु करण्यात आली आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर पंचायत समितीच्या पाटबंधारे विभागाने वीज देयक थकविल्याने वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत

**(१३) ६७४३ (१६-०४-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर पंचायत समितीच्या पाटबंधारे विभागाने रुपये ८ हजार वीज देयक थकविल्याने वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे, संगणक सेवेसह इतर शासकीय कामे प्रलंबित राहिल्याबाबतची घटना दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १४ जिल्हा परिषद गट आणि २८ पंचायत समिती गटातील ११० ग्रामपंचायतीतील तालुक्यातील विविध भागातील शैक्षणिक, पाणी, आरोग्य, बांधकाम इत्यादी समस्या घेऊन येणाऱ्या स्थानिक ग्रामस्थांना नाहक भुर्दंड व त्रास सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू थकीत विद्युत देयक तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०१-०६-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. वीज देयक थकीत राहील्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता. मात्र वीज पुरवठा खंडीत झालेल्या कालावधीत पंचायत समितीच्या इतर कार्यालयाच्या संगणकावरुन कामकाज करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. पाटबंधारे खात्याचा मीटर स्वतंत्र असल्याने यांचा पंचायत समितीच्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभागाच्या कामकाजावर कोणताही परिणाम झालेला नाही.

(३) दिनांक २२.१.२०२० रोजी थकीत वीज देयक भरणा करुन खंडीत झालेला वीज पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माजलगाव (जि.बीड) येथील रस्त्यांच्या कामांची तपासणी करण्याबाबत

**(१४) ९२६१ (२८-०५-२०२०). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील झालेल्या ५ रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून या रस्त्यांच्या कामांची तपासणी करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) प्रश्नाधीन रस्त्यांच्या कामांची कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. अंबाजोगाई यांचेमार्फत तपासणी केली असता सदर रस्त्यांवर करण्यात आलेली कामे सुस्थितीत असल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर शहराजवळील सोलापूर-पुणे-मनमाड या रस्त्याच्या कामाबाबत**

**(१५) ९६४७ (२८-०५-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहराजवळील सोलापूर-पुणे-मनमाड या बाह्यवळण रस्त्याच्या कामाचा दर्जा व कामाची प्रगती निविदेच्या अटी व शर्तीनुसार ठेवण्यात आली नसल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा अटी व शर्तीनुसार संबंधित ठेकेदारांवर करण्यात आलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) प्रश्नाधीन रस्त्यावरील मोठया प्रमाणात असणारी अवजड व इतर वाहतुक, दरवर्षी होणारा पाऊस, तसेच रिफायनरीत होणारा डांबराचा तुटवडा व मर्यादीत निधी इत्यादी मुळे सदर रस्त्यांचे काम प्रलंबित होते. तथापि सदर काम आता भौतिक दृष्टया पूर्ण झाले आहे व चाचणी अहवालानुसार काम गुणवत्ता पूर्ण झाले आहे.
(२) संबंधित कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुदखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निंबधक कार्यालयात दस्त नोंदणीत हेराफेरी करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत**

**(१६) ९८४५ (०३-०६-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निंबधक कार्यालयात वर्ष २०१७ ते २०१९ या कालावधीत दस्त नोंदणीत हेराफेरी करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुय्यम निंबधक, प्रशांत अंत्रेईड यांनी ई चलानद्वारे रक्कम भरून घेत असताना आय- सरीता या प्रणालितील अन्य पर्यायाचा अवलंब करून ई -चलानद्वारा रक्कम भरून न घेता तसे भासवून दोन वर्षात १५९ बनावट ई-चलानद्वारे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबत चौकशी करून संबंधित दुय्यम निबंधक व त्यांना सहकार्य करण्याऱ्या इतर अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच महसुलाची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर यांच्या अधिपत्याखालील तपासणी पथकाद्वारा दुय्यम निबंधक, मुदखेड या कार्यालयाची तपासणी करण्यात आलेली आहे. उक्त तपासणीमध्ये जवळपास २४४ दस्तामध्ये रु.१,५८,५६,०१०/- इतक्या महसुलाची हानी झाल्याचे दिसुन आले असल्याने संबंधित संगणक चालक (ऑपरेटर) यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच उक्त प्रकरणी जे संबंधीत अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत त्यांचे निलंबन करण्यात आले असुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच ज्या दस्तांमध्ये महसूल हानी झाली त्या सर्व प्रकरणात आक्षेपीत रक्कम वसुल करण्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत सह जिल्हा निबंधक नांदेड यांना दिलेले असुन सह जिल्हा निबंधक नांदेड यांचे स्तरावर वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोळवन (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील अपघाताबाबत**

**(१७) १००९६ (२९-०५-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळवन (ता.आर्णी, जि.यवतमाळ) गावाजवळ दिनांक १९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास एस.टी.बस व डंम्पर यांचा भिषण अपघात होऊन ४ प्रवाशांचा मृत्यु होवून १५ प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मृत कुटुंबियांच्या वारसांना तसेच जखमी प्रवाशांना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०८-२०२०) :** (१) होय.

सोलापूर आगाराची बस क्र.एमएच-१४ बी.टी.४६५१ ही सोलापूर ते छत्तीसगड सिमेवर मजूर पोहचविण्याकरीता जात असतांना कोळवन (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे अपघात झाला असून, सदर अपघातात ३ प्रवासी व १ चालक असे एकूण ४ व्यक्ती मृत झाले आहेत. तसेच बसमधील २५ प्रवासी व १ सहचालक असे एकूण २६ व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

(२) अपघाताची चौकशी पोलीस व राज्य परिवहन खात्यामार्फत करण्यात आली असून, प्राथमिक चौकशीमध्ये प्रथमदर्शनी सदर अपघातास मृत चालक जबाबदार आढळून आले आहेत. राज्य परिवहन चालकाविरुध्द मृत्युपश्चात आर्णी पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व ३०४ (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातातील मृत ३ प्रवाशांपैकी २ प्रवाशांच्या वारसांना आर्थिक तात्कालिक मदत प्रत्येकी १०,०००/- रुपये व अपघात नुकसान भरपाई मागणी करीता राज्य परिवहन नियमानुसार "पी" फॉर्म देण्यात आलेले आहेत. १ मृत प्रवासी श्री.अनुझ मांझी राहणार झारखंड यांचे वारस उपलब्ध न झाल्याने आर्थिक मदत देता आलेली नाही. तथापि, त्यांना मदत देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. २६ जखमी प्रवाशांना एकूण रु.१८,०००/- आर्थिक तात्कालीक मदत व अपघात नुकसान भरपाई मागणी करीता राज्य परिवहन नियमानुसार "पी" फॉर्म देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विविध भागामध्ये अडकून पडलेल्या नागरिकांना मोफत प्रवासाचा लाभ देण्याबाबत**

**(१८) १०२२९ (२९-०५-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाळेबंदीमुळे राज्यात विविध भागामध्ये अडकून पडलेले नागरिक, मजूर, विद्यार्थी, विस्थापित कामगार, यात्रेकरु आदिंना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मोफत शहरात व गावी सोडण्याचा निर्णय दिनांक ३ मे, २०२० रोजी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दि. ९.५.२०२० ते १७.५.२०२० या कालावधीत अडकलेल्या एकूण किती मजुर, विद्यार्थी, यात्रेकरु व विस्थापीतांना त्यांच्या शहर अथवा गावात सोडण्यात येऊन त्यांना मोफत प्रवासाचा शासनातर्फे लाभ देण्यात आला आहे,

(३) तसेच मोफत प्रवास सुविधा देणेबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**ॲड. अनिल परब (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

दि.०४.०५.२०२० रोजी टाळेबंदीमुळे राज्यात विविध भागांमध्ये अडकून पडलेले नागरिक, मजूर, विद्यार्थी, विस्थापित कामगार, यात्रेकरु इत्यादींना आपल्या मूळ गावी जाण्याकरीता श्रमिक रेल्वेमार्फत पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

दि.०९.०५.२०२० रोजी रोजी उपरोक्त सामाजिक घटकांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मोफत शहरात व गावी सोडण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला.

(२) व (३) दि.०९.०५.२०२० ते दि.१७.०५.२०२० या कालावधीत १७,१३६ फेऱ्यांद्वारे एकूण २,०८,१३६ इतक्या मजूर व विस्थापितांना त्यांच्या शहर अथवा गावात सोडण्यात आले. मजूर व विस्थापितांची अधिकची संख्या पाहता मोफत प्रवासाचा कालावधी दि.३१.०५.२०२० असा वाढविण्यात आला. दि.०९.०५.२०२० ते दि.३१.०५.२०२० या कालावधीत ४४,१०६ फेऱ्यांद्वारे एकूण ५,३७,५९३ इतक्या मजूर व विस्थापितांना त्यांच्या शहर व गावांत सोडण्यात येवून त्यांना मोफत प्रवासाचा लाभ देण्यात आला.

---

**पंचायत समिती चंद्रपूर कार्यालयाच्या नविन बांधकामाला मंजूरी मिळण्याबाबत**

**(१९) १०५०१ (०३-०६-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर पंचायत समितीच्या नविन कार्यालयाचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे असून सद्यःस्थितीत असलेली इमारत प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अपुरी पडत असल्याने या कार्यालयाच्या नविन बांधकामाला मंजूरी मिळणे आवश्यक असल्याने पंचायत समितीच्या दिनांक ३ मार्च, २०२० रोजीच्या झालेल्या मासिक सभेत याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती चंद्रपूर कार्यालयाच्या नविन बांधकामाला मंजूरी मिळण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च २०२० रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती चंद्रपूर कार्यालयाच्या नविन बांधकामाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०९-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) पंचायत समिती, चंद्रपूर इमारतीच्या जागेची मुळ मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्यामुळे सदरची जागा जिल्हा परिषदेच्या नावे करण्याची प्रक्रिया चालू आहे.

---

**परभणी जिल्ह्यात रिलायन्स जिओ कंपनीने अवैध गौण खनिज उत्खनन केल्याबाबत**

**(२०) १०८३० (०४-०६-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात शासनाची कोणतीही परवानगी न घेता रिलायन्स जिओ या कंपनीने खोदकाम तथा उत्खनन करून ऑप्टीकल फायबर केबल टाकल्याप्रकरणी रूपये २६ कोटीचा दंड दिनांक २२ जुन, २०१८ रोजी आकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी परभणी यांनी वारंवार कंपनीस कळवूनही प्रतिसाद न देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करावी व दंडासह रक्कम वसुल करण्याबाबत लाईट इन लाईफ या संस्थेने दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी परभणी व प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय यांना लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जिओ कंपनीकडून दंडासह रक्कम वसूल करून कंपनी विरूध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.१०/६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी जियो कंपनीचे अपील फेटाळून अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी आकारलेल्या दंडात्मक रक्कमेचे आदेश कायम केले होते. सदर दंडात्मक रक्कमेच्या वसूलीबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि.२१/१/२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २६७ नुसार रु.२५,९५,६३,७५०/- इतक्या दंडात्मक रक्कमेची मागणीची दि.३१/०१/२०२० रोजीची नोटीस जिओ कंपनीच्या मुंबई येथील कार्यालयास बजाविण्यात आली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने सदर कंपनीने अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दि.१०/६/२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे पुनर्विलोकन अर्ज सादर केला असून अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी पुनर्विलोकन अर्जावर निर्णय होईपर्यंत उक्त दंडात्मक रक्कमेच्या वसूलीस स्थगिती दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथे पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता शासकीय राखीव भूखंड मिळण्याबाबत**

**(२१) १०९६२ (०३-०६-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या रक्षा मंत्रालयाद्वारे राबवण्यात येणाऱ्या ECHS (Ex.Servicemen Contributory Health Scheme) पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील शासकीय राखीव भूखंड मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ शहराकरिता केंद्र शासनाच्या रक्षा मंत्रालयाद्वारे राबवण्यात येणाऱ्या ECHS (Ex.Servicemen Contributory Health Scheme) पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता मंजुरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबरनाथ शहरामध्ये भारतीय लष्कराकरिता दारुगोळा बनविणारा मोठा कारखाना आर्डनन्स फक्टरी तसेच नौसेनेचे नेवल मटेरीयल्स रिसर्च लेबोरेटरी (एम.आर.एम.एल.) तसेच मोठ्या प्रमाणात भारतीय लष्कर सेवेतून निवृत्त झालेले माजी सैनिक वास्तव्यास असल्याने अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील शासकीय राखीव भूखंड पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता मिळाल्यास फायदा होऊ शकेल असे निवेदनाद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अशा आशयाची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३०/०१/२०१९ रोजीच्या निवेदनान्वये शासनाकडे केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावात काही त्रुटी असल्यामुळे सदर त्रुटींची पूर्तता करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांना दिले आहेत.

---

## राज्यातील सात जिल्ह्यांत बंद करण्यात आलेला सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम पुनश्च सुरु करण्यासह स्वतंत्र सिकलसेल स्वयंसेवक तथा पर्यवेक्षक यांची सेवा पूर्ववत करण्याबाबत

**(२२) ११५९० (११-०८-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१ जिल्हयांमध्ये सिकलसेल आजार नियत्रंण कार्यक्रम सन २००८ पासून सुरु असून सदर कार्यक्रम २१ जिल्हयापैंकी पालघर , गोंदिया , नागपूर , भंडारा , चंद्रपूर , वर्धा व गडचिरोली या ७ जिल्हयांमध्ये स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येत होता व उर्वरित १४ जिल्ह्यामध्ये हा कार्यक्रम आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांचे मार्फत राबविण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०२० पासून उक्त ७ जिल्हयामधील स्वयंसेवी संस्था यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असून पालघर जिल्ह्यासह इतर सहा जिल्ह्यांत ११ हजार तीव्र आणि ३२ हजार वाहक असे सिकलसेल आजारग्रस्त रुग्णांची संख्या असतानाही आयुक्त, आरोग्य विभाग व अभियान यांनी कोरोना संक्रमणाच्या काळातच या सात जिल्ह्यांत सुरू असलेला सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम संपुष्टात आणला असल्याची बाब दिनांक २ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कार्यक्रम बंद करण्यात आला असल्याने बारा वर्षापासून या कार्यक्रमात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यासह सिकलसेल रुग्ण सद्यस्थितीत संकटात सापडले असून शासनाकडून सिकलसेलग्रस्त रुग्णांमध्ये रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी कोणताही कार्यक्रम

हाती घेण्यात आलेला नसून कोरोना संक्रमणाच्या काळात सिकलसेल रुग्णांची तपासणी केंद्र आणि उपचार केंद्र देखिल बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय  निष्पन्न झाले,

(५) असल्यास, त्यानुसार राज्यातील सात जिल्ह्यांत बंद करण्यात आलेला सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम पुनश्च सुरु करण्यासह  आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांचेवर असलेला कामाचा ताण लक्षात घेता या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र सिकलसेल स्वयंसेवक तथा पर्यवेक्षक यांची सेवा पूर्ववत करण्याच्या अनुषंगाने पुनर्विचार करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सिकलसेल आजार नियंत्रण हा कार्यक्रम दिनांक ३१.३.२०२० पर्यंत या ७ जिल्हयांमध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत होता.  सदर ७ जिल्हयात सुरु असलेला हा कार्यक्रम संपुष्टात आलेला नसून दिनांक १.४.२०२० पासून सदर कार्यक्रम आरोग्य विभागाच्या आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांच्या मार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याप्रमाणे सदर कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

मार्च ते जुन, २०२० च्या दरम्यान कोरोना संक्रमणामुळे सिकलसेल च्या रुग्णांची कमी प्रमाणात तपासणी झाली असली तरी या काळात एकूण ५३,३५८ Solubility Test व समुपदेशन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील पिंडकेपार लघुप्रकल्पाच्या पुर्णत्वाकरिता निधी मिळण्याबाबत**

**(२३) ११५९८ (१०-०८-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील पिंडकेपार लघु प्रकल्प ४० वर्षापुर्वी अडीच कोटीचा  होता तथापि या प्रकल्पामध्ये ११०.८ कोटी इतकी वाढ झाल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला सन २००७ ते २०१९ पर्यंत अल्प निधी उपलब्ध झाल्याने विकासकामे प्रगतीपथावर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला पुन्हा सुधारीत प्रशासकिय मान्यतेची आवश्यकता असल्याचे मध्यम प्रकल्प विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्प पुर्ण न झाल्याने अनेक शेतकरी सिंचनापासुन वंचित असल्याने या प्रकल्पाच्या पुर्णत्वाकरीता ८५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. प्रकल्पाकरीता आवश्यक ३४.७७ हे. वन जमिनीचे मान्यते अभावी प्रकल्पाची कामे १९८९ पासून बंद होती. प्रकल्पाच्या किंमतीत वाढ ही वनजमीन मंजुरी अभावी व शेतक-यांचा भुसंपादन विरोधामुळे झालेली आहे.
(२) नाही.
(३) नाही. सदर प्रकल्पास दि. ०२.०१.२०१९ रोजी रु. ११०.०८ कोटी एवढया किंमतीस द्वितीय सुप्रमा प्राप्त आहे. परंतु आवश्यक भुसंपादनाकरीता सुप्रमातील तरतुदी पेक्षा रु.३९.५० कोटी अतिरिक्त खर्च होणार असल्याने शासन पत्र क्र.सकिर्ण- २०२०/(१५६/ २०२०)/ लपा/जसंवि/२०२० दि.२७.०७.२०२० अन्वये सदर प्रकल्प रद्द करण्यात येत असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यामध्ये असणाऱ्या रुग्णालयामध्ये रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२४) १२०७६ (११-०८-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये रुग्णालय, शासकीय उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय यांचा समावेश आहे परतु तेथे रुग्णांची गैरसोय होत असून लेखापरीक्षणही केले जात नाही तसेच या योजनेअंतर्गत शासकीय रुग्णालयात काही आजारावर उपचार करण्यास बंधनकारक आहे पण खासगी रुग्णालयामध्ये सर्व आजारावर एकाच रुग्णालयात उपचार होत नसून ते रुग्णालयानुसार वेगवेगळया ठिकाणी होत असल्याने खासगी रुग्णालयामध्ये सर्व आजारावर उपचार करणे बंधनकारक असावेत अशी रुग्णांकडून मागणी होत आहे,, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत खासगी रुग्णालयातही मोफत उपचार केले जातील अशी घोषणा मा.आरोग्य मंत्री यांनी केली असून महाराष्ट्रातील ४०००० खासगी रुग्णालयांपैकी केवळ ५०० रुग्णालयांचा समावेश महात्मा फुले जन आरोग्य योजनेत असल्याने ३९५०० खासगी रुग्णालयांमधील कोरोनाबाधित रुग्णांना मोफत उपचार मिळणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतंर्गत नवीन रुग्णालय वाढवण्याचा शासनाचा विचार असेल तर डायलिसिस व कॅन्सर वर उपचार करण्या-या रुग्णालयांची संख्या वाढविण्यबाबत देखील मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयात रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेसाठी डॉक्टर उपलब्ध होत नसणे तपासणीसाठी आवश्यक असणारे एक्सरे मशीन, सोनोग्राफी, डायलिसिस, ऑप्रशेनथेटर, तसेच जनरेटर बॅकअप उपलब्ध असल्यास ही उपकरणे हाताळण्यासाठी कर्मवारी वर्गाची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतगर्त खासगी रुग्यालयामध्ये कोरोना रुग्णासाठी राखीव खाटांची उपलब्ध व दरपत्रकासंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसून रुग्णाच्या उपचारासाठी रुग्णांकडुन २० ते २५ टक्के आगाऊ रक्कम घेऊन त्यांना ही रक्कम काही महिन्यांनी रिफंड करण्याचे आश्वासन देण्यात येते तसेच या योजनेमध्ये सहभागी रुग्णालये निर्धारित रुग्णसंख्या पूर्ण झाल्याचे सांगुन रुग्णाला दाखल करून घेत नाहीत व पीपीई किटची अतिरिक्त दर मागणी, मृतदेहाची अडवणूक करण्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या योजनेतंर्गत मिळणा-या सेवेचा लाभ जास्तीत जास्त रुग्णांना मिळावा व खासगी रुग्णालयामध्ये सर्व आजारावर उपचार करणे बंधनकारक करावे तसेच सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करून कोरोना आजाराच्या रुग्णांना मोफत उपचार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०२-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३१ मार्च, २०२० अखेरीस योजनेमध्ये ४९२ रुग्णालये अंगीकृत होती.

दिनांक १ एप्रिल, २०२० पासून राबविण्यात येणाऱ्या सुधारित एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये सध्या एकूण ९९० (२९७ शासकीय व ६९३ खाजगी) अंगीकृत रुग्णालये आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यास ९९६ उपचाराचा लाभ अनुज्ञेय असून त्यापैकी १३१ उपचार तर प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यास १२०९ उपचाराचा लाभ अनुज्ञेय असून १६८ शासकीय रुग्णालयासाठी राखीव आहेत.

(२) राज्यातील प्रत्येक तालुक्यात किमान २ अंगीकृत रुग्णालये असावीत, असे शासनाचे धोरण असून विशिष्ट निकषानुसार ते अंगीकृत केले जातात. योजनेंतर्गत सध्या ९९० रुग्णालये अंगीकृत असून त्यापैकी ६९३ रुग्णालये खाजगी तर २९७ शासकीय आहेत. अंगीकृत रुग्णालयातून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यास ९९६ उपचाराचा तर प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यास १२०९ उपचाराचा लाभ मिळत आहे.

तर कोरोना बाधित रुग्णांना २० पॅकेजेस उपलब्ध आहेत. व्हेंटिलेटरसह व नॉन व्हेंटिलेटरसह उपचारांचा लाभ मिळत आहे.

(३) सध्या डायलिसीस साठी ५७१ रुग्णालये तर कॅन्सर उपचारासाठी ५३० रुग्णालये अंगीकृत आहेत. त्यामध्ये सर्जिकल ऑन्कोलॉजी २८६, मेडिकल ऑन्कोलॉजी १९७ व रेडीएशन ओन्कोलॉजी ४७ आहेत.

(४) रुग्णालय अंगीकृत करतेवेळी सर्व सुविधा उपलब्ध असल्याची व विहित निकष पुर्तता होत असल्याची खात्री करून रुग्णालय अंगीकृत केले जाते.

(५) कोरोना साथरोगाच्या काळात योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांनी उपचारासाठी नकार दिल्याबाबत व अतिरिक्त पैसे घेतल्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे १६५ तक्रारी प्राप्त झाल्या असून तक्रारींचे निराकरण होण्याची प्रक्रिया चालू आहे.

पीपीई किटची अतिरिक्त दराची मागणी व मृतदेहाची अडवणूक करण्याबाबत अंगीकृत रुग्णालयांविरुद्ध कोणतीही तक्रार राज्य आरोग्य हमी सोसायटीस अद्याप प्राप्त झाली नाही.

शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२० नुसार शासनाकडून अंगीकृत रुग्णालयांना पीपीई किटचा पुरवठा करण्यात येत असून अंगीकृत रुग्णालयांना १२९६८ पीपीई किटचा पुरवठा करण्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीने दिनांक ०७.०८.२०२० च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

(६) कोव्हिड १९ च्या साथीच्या पार्श्वभूमीवर दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या ९९६ उपचारांचा लाभ मिळत असुन, ६७ अतिरिक्त उपचाराची खाजगी अंगीकृत रुग्णालयात मोफत सोय करण्यात आली आहे.

तसेच १२० शासकीय रुग्णालयासाठी राखीव उपचार खाजगी अंगीकृत रुग्णालयांना करण्यास परवानगी देण्यात आली आहे. दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयास दिनांक १८ ऑगस्ट, २०२० च्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

(७) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## सुगंधी दुधाच्या पुरवठ्यासाठी निविदा प्रक्रियेत अपात्र ठरलेल्या विश्वभारती फुड्स कंपनीस ठेका दिल्याबाबत

**(२५) १२०७७ (१३-०७-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५२८ आदिवासी आश्रमशाळांमध्ये २ लाखाहून अधिक मुले शिक्षण घेत असून त्यांना पोषण आहाराअंतर्गत दररोज २०० मिली सुगंधी दूध देण्याचा निर्णय सन २०१८ मध्ये आदिवासी विभागाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुगंधी दुधाच्या पुरवठ्यासाठी दिनांक ५ नोव्हेंबर २०१८ रोजी ऑनलाईन निविदा मागवून ४ कंपन्यांना दुध पुरवठ्याचा ठेका देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विश्वभारती फुड्स या कंपनीने निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तीचे उल्लघंन केले असतानाही सुगंधी दुध पुरवठा करण्याचा ठेका त्यांना देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले त्यानुसार संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२०-०८-२०२०) :** (१) आश्रमशाळेतील विध्यार्थ्यांना दोनशे मिली टेट्रापॅक (सुगंधी दुध ) पुरविण्याची निविदा नोव्हेंबर,२०१८ मध्ये प्रसिध्द केली हे  खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) विश्वभारती फूड्सने पुरवठा चालु केल्यानंतर लोकप्रतिनिधींकडून त्यांच्याबाबत तक्रारी येऊ लागल्या. सदर तक्रारीबाबत आयुक्तालयाकडून चौकशी केली असता, मे. विश्वभारती फूड्सने निविदेतील अटींचा  भंग केल्याचे चौकशीअंती  सिध्द झाल्याने त्यांचा शासकिय आश्रमशाळांना दुध पुरवठयाचा आदेश व करारनामा  आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे आदेश दि. १८.०५.२०२० अन्वये रद्द करण्यात आलेला आहे.

---

**दाऊळ तावखेडा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) याठिकाणी नविन वीजउपकेंद्र उभारण्याबाबत**

**(२६) १२२१५ (१३-०७-२०२०). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाऊळ तावखेडा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) याठिकाणी अद्याप १३२ के.व्ही.ए.चे वीज केंद्र नसल्यामुळे शेतकऱ्यांना कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी १३२ के.व्ही.ए.चे वीजकेंद्र मागील काळात शासनाने मंजूर केले असून सदरील जागा महावितरणच्या सिव्हील विभागाने पाहणी करून ताब्यात  घेतली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज उपकेंद्र उभारण्यासाठी शासनाने अद्यापपर्यत निधी न दिल्यामुळे वीज केंद्र उभारण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीज केंद्रासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०७-०८-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) दाऊळ तावखेडा, शेंडवाडे, झोतवाडे, माहूर (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या गावातील कृषि ग्राहकांना १३२ के.व्ही. दोंडाईचा उपकेंद्र येथून ११ के. व्ही. निमगुळ कृषी वाहिनीद्वारे वीजपुरवठा करण्यात येतो. सदर वाहिनी ही ३२ कि.मी. लांब आहे. तसेच सदर वाहिनीवर जास्त वीजजोडभार असल्यामुळे शेती हंगामाच्या कालावधीत अंतिम टोकावर असलेल्या कृषीपंपाना कमी दाबाने वीजपुरवठा होतो.

दाऊळ तावखेडा, शेंडवाडे, झोतवाडे, माहूर (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या गावातील कृषी ग्राहकांना योग्य दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी उच्चदाब प्रणाली अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन आहे. त्यासाठी धुळे मंडळाअंतर्गत स्थापत्य विभागाकडून ३३/११ के.व्ही. तावखेडा उपकेंद्रासाठी तावखेडा गावाच्या सीमेलगत मौजे दाऊळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील गट क्र. ९१ मधील क्षेत्र ०७ हे. ०३ आर पैकी ० हे. ४० आर जागा मा.जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडून पत्र क्र.मशा/(ब)/कक्ष-१/गावठण/कावि/१७/२०१९ नुसार ताब्यात घेण्यात आली आहे.

---

**परभणी जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर कापूस खरेदी करण्याबाबत**

**(२७) १२२३१ (१४-०७-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) तालुक्यातील शासकीय कापूस खरेदी केंद्रावर सीसीआयच्या वतीने सुरु असलेल्या कापूस खरेदी अंतर्गत मनमानी पद्धतीने दररोज नवीन नियम लागू करण्यात येत असल्याने शेतकरी त्रस्त होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी दोन वाहनातून कापूस आणल्यास त्यातील एक वाहन परत करण्यात येत आहे, तसेच आयशर या वाहनातून माल आणू नये असेही बंधन घातले असून एका वाहनातील केवळ ३९ क्विंटलच कापूस खरेदी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सीसीआय व पणन महासंघाने गेल्या २५ दिवसात परभणी जिल्ह्यातील केवळ ८ हजार ७१९ कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस खरेदी केला असून अद्याप ३५ हजार नोंदणीकृत शेतकरी कापूस खरेदीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केवळ १५ दिवसाचा अवधी कापूस खरेदीसाठी शिल्लक असल्यामुळे शेतकरी चिंतेत असून राज्य शासनाने भावांतर योजना लागू करून कापूस विक्रीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा कापूस खुल्या बाजारात विक्रीसाठी परवानगी द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांचा सर्व कापूस शासकीय कापूस खरेदी केंद्रावर खरेदी करण्याबाबत तसेच मनमानी पद्धतीने नियम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३०-०७-२०२०) :** नाही हे खरे नाही.

लहान व मध्यम शेतकरी यांचा कापूस प्राधान्याने हमी भावाने खरेदी व्हावा या उद्देशाने केंद्र प्रमुख, भारतीय कापूस महामंडळ मर्या., मानवत केंद्र यांनी मोठ्या वाहनातून (जसे की आयशर) कापूस आणण्यास दि.२७/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये मनाई केली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

आयशर सारख्या मोठ्या वाहनातून कापूस आणल्यास, त्या कापसाचे वजन करुन घेण्यास उशिर होतो. मोठी वाहने जास्त आल्यास, त्याचा परिणाम छोट्या शेतकऱ्यांच्या कापूस खरेदीवर निश्चितच होतो. त्यामुळे, छोट्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त हमी भाव खरेदीचा फायदा मिळावा या हेतूने एका शेतकऱ्यास एका दिवसात ४० क्विंटल कापूस आणण्याचे कळविले होते. एका शेतकऱ्याने ४० क्विंटल पेक्षा जास्त कापूस विक्रीस आणण्यास, अशा प्रकरणी मात्र कृषि उत्पन्न बाजार समितीने अनुमती दिल्यानंतर कापूस खरेदी केला जात असे.

(३) नाही, हे खरे नाही.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे झालेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत कापूस खरेदी साठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची पडताळणी केल्यानंतर, ३२,८५८ इतके पात्र शेतकरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यापैकी, दि.२०/०७/२०२० अखेर पर्यंत CCI व कापूस पणन महासंघाने २४,५४२ शेतकऱ्यांचा ३,७५,५५९ क्विंटल कापूस खरेदी केला असून, नोंदणी केलेले ११,३१६ शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करणे शिल्लक आहे.

(४) व (५) नाही, हे खरे नाही.

कापसाची हमी भावाने खरेदी केंद्र शासनाचे वस्त्रोद्योग विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणून भारतीय कापूस महामंडळ (CCI) तसेच, CCI चे उप अभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या., यांच्यामार्फत केली जाते. कापसाची खरेदी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वतीने मुख्य अभिकर्ता म्हणून CCI मार्फत केली जाते. त्यामुळे, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय व CCI ने निश्चित केलेल्या नियमावलीनुसार खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. तसेच मुख्य अभिकर्ता, CCI ने FAQ दर्जाचा कापूस दि. ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत खरेदी करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणे गव्हाड (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) व १४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या निकृष्ट कामाबाबत**

**(२८) १२२८८ (११-०७-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणे गव्हाड (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) व १४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनसाठी खरेदी केलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक १ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेच्या पाईपलाईनसाठीचे पाईप व इतर निकृष्ट साहित्य खरेदी करून सदर पाणीपुरवठा योजनेत आर्थिक अनियमितता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही सदर योजनेअंतर्गत असलेल्या उपांगाकरिता लागणारे डी.आय.के-९ पाईप्स महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत व त्रयस्थ यंत्रणेच्या तपासणी नंतरच पुरवठा करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विहीरगाव (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथे शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचे चुकारे थकीत असल्याबाबत**

**(२९) १२३०५ (१३-०७-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विहीरगाव (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथे आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या मार्फत सन २०१९-२०२० च्या खरीप हंगामात शेतकऱ्यांकडुन आधारभुत किंमतीने धान खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धान खरेदी केंद्रावरील शेकडो शेतकऱ्यांचे एकुण ६० लक्ष रुपयाचे चुकारे थकीत असल्याचे माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना थकीत चुकारे अदा करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (३०-०७-२०२०) :** (१) सन २०१९-२०२० च्या खरीप हंगामातील गडचिरोली जिल्हयातील आरमोरी तालुक्यातील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, विहीरगाव मार्फत ४८१ शेतकऱ्यांकडून वजन १३९८३.९५ क्विंटल धानाची खरेदी करण्यांत आली असून, त्याची एकूण रक्कम रु.२,५३,८०,८६९.३५ इतकी आहे.
(२) सन २०१९-२०२० च्या खरीप हंगामातील विहीरगांव (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील धान खरेदी केंद्रावरील ३९२ शेतकऱ्यांच्या देयकाची रु.२,०६,२३,३५४.९५ इतकी रक्कम दि.०२.०१.२०२० ते दि.०७.०४.२०२० या कालावधीत अदा करण्यांत आली आहे. तसेच उर्वरित ८९ शेतकऱ्यांच्या देयकाची रु.४७,५७,५१४.३० इतकी रक्कम दि.२२.०५.२०२० रोजी अदा करण्यांत आली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील इचलकरंजी अर्बन को ऑफ बँक लि. या बॅकेतील ठेवीदारांच्या ठेवीबाबत**

**(३०) १२४२१ (१४-०७-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये इचलकरंजी अर्बन को ऑपरेटीव्ह बँक लि. इचलकरंजी बँकेची रत्नागिरी व चिपळूण विभागातील शाखा सन २००९ पर्यंत अस्तित्वात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेचे व्यवहार बंद असून ती अवसायानात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बँकेत असंख्य ठेवीदारांनी आपल्या ठेवी ठेवल्या असून सद्य:स्थितीत बँक बंद असल्याने ठेवीदारांच्या अनेक ठेवी अडकून पडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेवीदारांच्या ठेवी सदर बँकेकडून परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०५-०८-२०२०) :** (१) व (२) होय.

(३) व (४) इचलकरंजी अर्बन को ऑपरेटीव्ह बँक लि. इचलकरंजी, जि. कोल्हापूर हि बँक सहकार आयुक्तांच्या दि. ०४.०३.२०१० च्या आदेशान्वये अवसायनात घेण्यात आली.

अवसायनाचे तारखेस बँकेमध्ये सुमारे रु. ८८.१० कोटींच्या ठेवी होत्या. त्यापैकी जून २०२० अखेर रु. ५२.०६ कोटी इतक्या रकमेच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत.

बँकेचे थकीत कर्ज रु. ३३.९७ कोटी असून सदर कर्जाची वसुली सुरू असून वसूल रक्कमेतून ठेवी अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. याव्यतिरिक्त बँकेच्या मालकीच्या दोन मालमत्तांच्या विक्रीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील नदी खोऱ्यातील पूर परिस्थितीसंदर्भात करावयाच्या उपाययोजना**

**(३१) १२४९४ (१८-०७-२०२०). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले), श्री.मानसिंग नाईक (शिराळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून यावर उपाययोजना सुचविण्यासाठी वडनेरे पूर अभ्यास समिती गठीत करण्यात आली असून या समितीने कृष्णा-भीमा, पंचगंगा व वारणा नदी खोऱ्यातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून त्याचा निष्कर्ष व शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कर्नाटकातील अलमट्टी धरणातील पाण्याचा विसर्ग न झाल्यामुळे पाण्याची पातळी वाढून  कोल्हापूर, सांगली, सातारामध्ये पूर परिस्थिती निर्माण होते हे गतवर्षी आलेल्या पूर परिस्थितीचा अभ्यास करता निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अलमट्टी धरणातील पाण्याचा विसर्ग एका क्षमतेपेक्षा जास्त वाढविल्यास कर्नाटकमध्ये पूर परिस्थिती निर्माण होत असल्याने विसर्ग वाढविण्यासाठी कर्नाटक शासन तयार होत नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्रातील धरणात यावर्षी पाणी उपलब्धता चांगली असल्याने कर्नाटक शासनाला अलमट्टी धरणातून वेळेआधी व अधिक विसर्ग करावा लागल्यास महाराष्ट्र त्या पाण्याची भरपाई देखिल करू शकेल, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, महाराष्ट्राच्या धरणांमध्ये गतवर्षीपेक्षा असलेला जास्त पाणीसाठा तसेच हवामान विभागाने यंदा ९५ ते १०४ टक्के पर्जन्यमान असण्याचा व्यक्त केलेला अंदाज पाहता, गतवर्षीप्रमाणे पूर परिस्थिती ओढवू नये याकरिता कर्नाटक सरकारसोबत मुख्यमंत्री स्तरावर बैठक आयोजित करून, बोलणी करून संयुक्त योजना करार स्वरूपात निश्चित करण्याची आवश्कता आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त सर्व वस्तुस्थिती नमूद करून विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १८ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्र लिहून त्याद्वारे उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, भविष्यात पुनः पूर परिस्थिती उद्भवू नये याकरिता शासनाने वडनेरे पुर अभ्यास समितीने सुचविलेल्या  शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत व मा.विरोधी पक्ष नेता,विधान सभा यांनी मा.मुख्यमंत्री याना पत्राद्वारे नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (३१-०८-२०२०) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) हे खरे नाही. तथापि, दोन्ही राज्याचे मा. जलसंपदा मंत्री स्तरावर दिनांक ८/७/२०२० रोजी पूरनियंत्रण व आंतरराज्य पाणी वाटप संदर्भात बैठक संपन्न झाली व सदर बैठकीत पूरपरिस्थिती उद्भवू नये याची खबरदारी दोन्ही राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेने घ्यावी अशा सूचना दिल्या व त्यानुसार कार्यवाही करणेत आली असून, परिपरिस्थिती निर्माण होऊ नये याची दक्षता घेणेत आली आहे.
(६) होय.
(७) वडनेरे समितीच्या अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

## आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी विकेलेल्या ऊसाची थकीत रक्कम मिळण्याबाबत

**(३२) १२५३० (१४-०७-२०२०). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) गावासह परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी यांनी दरवर्षी हजारो टन ऊस मंगळूर येथील डेक्कन शुगर कंपनीला विकला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गळीत हंगाम सन २०१९-२०२० मध्ये शेतकऱ्यांनी विकलेल्या ऊसाची सुमारे १.९० कोटी इतकी रक्कम उक्त कंपनीने थकविल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या कोरोना महामारीच्या परिस्थितीमुळे तसेच पीक व्यवस्थापन व खरीप हंगामाकरीता खर्च करण्याकरीता शेतकऱ्यांकडे पैसे नसल्याने बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांची थकीत रक्कम परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

गळीत हंगाम २०१९-२० मध्ये आसरा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील १०१ शेतकऱ्यांनी ९९३९.२३० मे.टन ऊस डेक्कन शुगर लि. मंगरुळ, जि.यवतमाळ या कारखान्यास गाळप करणेसाठी पुरवठा केलेला आहे.

(२) गळीत हंगाम २०१९-२० मध्ये आसरा गांव व परिसरातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी डेक्कन कारखान्यास पुरविलेल्या ९९३९.२३० मे.टन ऊसाचे देय FRP प्रमाणे रु.१.१७ कोटी इतकी रक्कम आहे. यापैकी कारखान्याने ऊस पुरवठादारांना रु.८६.०३ लाख ऊसाचे पेमेंट केले असून कारखान्याकडे दि.२२.७.२०२० अखेर रु.३०.५४ लाख रक्कम थकीत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

कोविड-१९ या महामारीमुळे देशात व आंतरराष्ट्रीय स्तरावर लॉकडाऊन जाहीर झाल्याने दळणवळण व्यवस्था मोठ्या प्रमाणात बंद होवून सर्व आर्थिक व्यवहार थंडावलेले आहेत. या काळात कारखान्यांना साखरेची विक्री पुरेशा प्रमाणात करता आली नाही. त्यामुळे निधी कमतरतेमुळे साखर कारखान्यांना शेतकऱ्यांची ऊस देयके सत्वर अदा करता आलेली नाहीत.

(४) डेक्कन शुगर्स या कारखान्याकडील थकीत FRP संदर्भात ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(८) च्या तरतुदीनुसार RRC प्रमाणे कारवाई करणेबाबत साखर आयुक्तालयाचे स्तरावरुन कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अंतर्गत विविध विभागात झालेल्या निविदा प्रक्रियेबाबत**

**(३३) १२५९० (०६-०८-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अंतर्गत विविध विभागात सन २०१९ साली झालेल्या निविदा प्रक्रियेत (अ) मे.गुरू रामदास कंस्ट्रक्शन कंपनी नांदेड (रुपये ५४ कोटी), (ब) मे.ओमकार कंस्ट्रक्शन (रुपये २७ कोटी) व (क) मे.गुरू रामदास कंस्ट्रक्शन कंपनी नांदेड (रुपये ५० कोटी) या कंत्राटदारांना सव्वाशे कोटी रुपयांची कामे दिली गेली असुन ही कामे देत असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या "बिड कपॅसिटी" या नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग वगळून इतर विभाग जसे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, नांदेड महानगरपालिका, MIDC जिल्ह्यातील नगर पालिका व अन्य विभागात या कंपन्यांच्या नावे प्रलंबित असलेल्या कामांचा आढावा बांधकाम विभागाने घेणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी झालेल्या निविदा प्रक्रियेत या कंपन्यांना दिलेली कामे त्यांनी विहीत कालावधीत पूर्ण न करणे/अर्धवट करणे/दर्जाहीन करणे वा काम सुरू करण्याचे आदेश होऊन सुद्धा काम सुरू न करणे व काही कालावधी नंतर अंदाजपत्रकात बदल करून शासनाच्या तिजोरीवर आर्थिक भार वाढविणे अशा प्रकारची कामे या कंत्राटदाराकडून केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तरोडा (ता.हदगांव जि.नांदेड) येथील पांडूरंग दाल उत्पादक औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(३४) १२६३१ (१८-०७-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तरोडा (ता.हदगांव जि.नांदेड) येथील पांडूरंग दाल उत्पादक औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाचे २ कोटी रुपये परस्पर उचलून शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी संबंधित संस्थेचे चेअरमन/सचिव यांच्या विरुध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपहार झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या दि.३१.३.२०१९ अखेरपर्यंतच्या लेखापरीक्षण कामासाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, नांदेड यांचे अधिन लेखापरीक्षक, श्रेणी-१ यांची नियुक्ती केली होती. त्यांना संस्थेने रेकॉर्ड उपलब्ध करुन न दिल्याने, संस्थेच्या बँक खाते उताऱ्यानुसार शासनाकडुन प्राप्त झालेली रक्कम रु.२ कोटी उचल झाली असल्याने व त्याच्या विनियोगाबाबत सदर संस्थेने अभिलेख तयार करुन विनियोग सादर केलेला नसल्याने शासनाची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुसार यासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यासाठी लेखापरीक्षक, श्रेणी-१, अधिन जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, नांदेड यांना प्राधिकृत केले असून त्यांनी पोलीस स्टेशन, मनाठा, ता.हदगाव, जि.नांदेड येथे संस्थेचे चेअरमन व सचिव यांचेविरुद्ध दि.२२.११.२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे. त्यानुसार तपास सुरू आहे.
(३) संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीचे उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या दृष्टीकोनातून सहाय्यभूत होण्यासाठी सदर प्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, हदगांव, जि.नांदेड यांनी त्यांचे दि.१७.६.२०२० रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, हदगांव, जि.नांदेड यांची नियुक्ती केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वनधन केंद्रांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) १२७८० (१४-०७-२०२०). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी आपल्या उपजिविकेसाठी वन उत्पादने म्हणजेच महू, चारोळी, डिंक, तेंदूपत्ता, बेहडा गोळा करून त्यावर प्रक्रिया आणि विक्री केली जाते परंतु सध्या संचारबंदीमुळे ही संपूर्ण प्रक्रिया बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युनुसेफ आणि ट्रायफेड यांनी आदिवासी क्षेत्रातील वन उत्पादने गोळा करणाऱ्या आदिवासींना सामाजिक अंतराची माहीती देऊन सुरक्षितरित्या वनउपज गोळा करण्याच्या पद्धतीचे प्रशिक्षण देण्यासंदर्भात माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये अद्याप वनधन केंद्रांना निधी उपलब्ध न झाल्याने दलाल वर्ग आदिवासींचे शोषण करत असुन आदिवासीनी, गोळा केलेली उत्पादने अत्यंत कमी किंमतीत विकली जात असल्याने आदिवासींच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास वनधन केंद्रानाच वन उत्पादने खरेदी करण्याची मान्यता द्यावी अशी मागणी आदिवासीच्या संघटनांनी केली असुन शासनाने त्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(५) अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (३०-०७-२०२०) :** (१) गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी त्यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजीच्या पत्रान्वये गौणवनउपज गोळा करुन त्यावर प्रक्रिया आणि विक्री करणे इत्यादीबाबत परवानगी दिली आहे.

(२) युनिसेफकडून दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी देश पातळीवर व दिनांक १५ एप्रिल, २०२० रोजी राज्यस्तरावर आदिवासी क्षेत्रातील वन उत्पादने गोळा करणाऱ्या आदिवासींना सामाजिक अंतराची माहिती देऊन सुरक्षितरित्या वनउपज गोळा करण्याच्या पध्दतीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(३) ट्रायफेड, नवी दिल्ली यांनी महाराष्ट्र राज्यातील ६४ मंजूर वनधन केंद्रांना प्रशिक्षणाकरीता प्रत्येकी रु.५.०० लक्ष व यंत्र सामुग्री खरेदीकरीता प्रत्येकी रु.१०.०० लक्ष असे एकूण रु.१५.०० लक्ष निधी शबरी आदिवासी वित्त् व विकास महामंडळास उपलब्ध् करुन दिला आहे. शबरी आदिवासी वित्त् व विकास महामंडळाने सदरच्या निधीमधून ४० वनधन केंद्रांना वनकेंद्रांच्या व्यवसाय आराखडयातील मागणीनुसार रु.७०.०० लक्ष पर्यंत निधी वितरीत करण्यांत आला आहे. तसेच उपकरणे/साहित्य खरेदीकरीता ७ वनधन केंद्रांना प्रत्येकी रु.५.०० लक्ष प्रमाणे मिळून एकूण रु.३५.०० लक्ष वितरीत करण्यांत आला आहे.

(४) श्री.अर्जुनजी मुंडा, मा.मंत्री, केंद्रीय जनजातीय यांनी दि.०६.०४.२०२० रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाची किमान आधारभूत दरावरील गौणवनउपज योजने अंतर्गत उपलब्ध् निधी वनधन केंद्रांना गौणवनोपज खरेदी करण्याकरीता देण्यात यावा असे कळविले होते. त्याअनुषंगाने २० वनधन केंद्रांना प्रत्येकी रु.५.०० लक्ष प्रमाणे एकूण रु.१.०० कोटी निधी वितरीत करण्यांत आला आहे. १६ वनधन केद्रांना निधी वितरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**आदिवासी विविध कार्यकारी संस्था, मोहली (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथे धान खरेदी केंद्रावरील अनागोंदी कारभाराबाबत**

**(३६) १२८१२ (१९-०७-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहली, (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या अनागोंदी कारभारामुळे धान खरेदी केंद्रावर शेकडो शेतकऱ्यांच्या धानाची विक्री शिल्लक असुन विक्री झालेल्या धानाचे चुकारे थकीत असल्याचे माहे जुन २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त् धान खरेदी केंद्रावरील शिल्लक शेतकऱ्यांची धान खरेदी व शेतकऱ्यांना थकीत चुकारे अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-०८-२०२०) :** (१) खरीप पणन हंगाम २०१९-२० मधील आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय , धानोरा अधिनस्त असलेले खरेदी केंद्र, मोहली कार्यक्षेत्रात ६७९ शेतकऱ्यांकडून २०५७३.६६ क्विंटल धानाची खरेदी केली असून, देयकांची रु.३.७३ कोटीची रक्कम शेतकऱ्यांना दि.०६.०६.२०२० पर्यंत अदा करण्यांत आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगांव-आर्वी (जि.वर्धा) या रस्त्याचे काम संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(३७) १३०२३ (०६-०८-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ पासून ते तळेगांव-आर्वी पर्यंत या १३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम २ वर्षापूर्वी मंजुरी मिळुन कामास सुरूवात करण्यात आली परंतु तेथील कंत्राटदाराने सदर रस्त्याची कामे पेटी कंत्राटदाराला (स्वत: प्रत्यक्ष काम न करता इतर स्थानिक कंत्राटदाराकडुन करुन घेणे) दिली असल्यामुळे सदर काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाच्या सुरुवातीपासुनच संपुर्ण रस्त्याचे व वर्धामनेरी गावानजीक असलेल्या नदीच्या पुलाचे खोदकाम करून रस्त्याच्या बाजुला बांधकाम साहित्य टाकून ठेवले असल्यामुळे अनेकदा दोन चाकी, चार चाकी वाहन धारकांचे अपघात होऊन अनेकजण जखमी सुध्दा झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धामनेरी येथील पुलाचे बांधकाम अद्यापपर्यंत पुर्ण केले नसुन केवळ खोदकाम करून ठेवले आहे, पावसाळ्याच्या दिवसांत या नदीला मोठ्या प्रमाणात पुर येत

असतो व आष्टी, कांरजा या तालुक्यातील नागरिकांना उपविभागीय कार्यालय हे आर्वी येथे असल्यामुळे दळणवळणाकरिता हा एकमेव मार्ग आहे, त्यामुळे या पुलाचे बांधकाम पावसाळ्यापुर्वी न झाल्यास हा मार्ग वाहतुकीस पुर्णत: बंद होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होण्यास जबाबदार असणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत तसेच वर्धामनेरी येथील पुलाचे बांधकाम लवकरात-लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०८-२०२०)** :(१) सदर कामाचे मे. वशिष्ठ प्रोजेक्ट, हैद्राबाद कंपनीला दि. ११.१०.२०१८ ला कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे.या कामाचे छोटे छोटे इतर कंत्राट देण्यात आलेले आहेत, ही बाब खरी नाही.
(२) या कामाचे प्रथम टप्प्यात कंत्राटदाराने ६.०० किमी. लांबीत कामास सुरुवात केली व माहे जानेवारी २०२० ला वर्धामनेरी पूलाचे बांधकामास सुरुवात केली आहे. सद्यस्थितीत रस्ता व पूलाचे बांधकामामुळे सदर लांबीत अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) तळेगांव-आर्वी मार्गावरील वर्धमनेरी गावाजवळील लहान पूलाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. कंत्राटदाराची पूल बांधकामाची असमाधानकारक प्रगती बघता, शासनामार्फत त्वरीत कार्यवाही करुन कंत्राटदाराचे रिस्क अॅन्ड कॉस्ट वर या स्थळावर vented causeway चे बांधकाम रितसर निविदा करुन इतर कंत्राटदारातर्फे पूर्ण करण्यात आलेले आहे व त्यामुळे वाहतुक निर्बाधीत व सुस्थितीत सुरु आहे.
(४) सदर काम गुणवत्तेनुसार व मंजूर वावानुसार होत असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता भासली नाही. उक्त कामाची गती संथ असल्याने सदर कामाचे करारनामा रद्द करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास (MoRTH ) सादर करण्यांत आलेला आहे व उर्वरीत काम करण्याकरीता निविदा प्रक्रीया सुरु करण्यांत आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आर्वी (जि.वर्धा) येथील आष्टी-द्रुगवाडा रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) १३०९३ (१८-०८-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) व आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील आष्टी-द्रुगवाडा रस्त्याचे कामासाठी आष्टी-पंचाळा रस्त्यावर आर.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी गिट्टी क्रेशर सुरू केले असून त्यासाठी लागणारा दगड -गोटा काढण्यासाठी जमीनीमध्ये बोर व ब्लास्टींग करून काढले जात असून रॉयल्टी पेक्षा जास्त मालाची उचल केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गिट्टी क्रेशरसाठी होणाऱ्या ब्लास्टींगमुळे दगड व धुळ ही लांबपर्यंत उडत असल्याने परिसरातील शेतात काम करणाऱ्या मजुर व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून

गिट्टी क्रेशर मधुन उडणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिके उध्वस्त झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आष्टी-पंचाळा हा रस्ता पंतप्रधान ग्राम सडक योजनेमधुन नविन तयार केलेला असुन रस्त्याची माल वाहतुक क्षमता १० टन इतकी असतांनी सदर कंपनी गिट्टी क्रेशरवरून ४० टन क्षमतेचे डंफरद्वारे वाहतुक करित असल्यामुळे सदर रस्त्याची अत्यंत दूरवस्था झाली आहे, यामुळे गावकऱ्यांच्या दळण -वळणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर कंपनीद्वारे सुरु असलेल्या आष्टी - द्रुगवाडा रस्त्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास येत असुन मौजा गणेशपुर येथील रस्त्याची रूंदी कमी करणे, लेंडी नदीवरील पुलामध्ये सिमेंट व सळाकीचे प्रमाण कमी असणे, पुलाची रूंदी व जाडी अंदाजपत्रकापेक्षा कमी असणे अशाप्रकारे रस्त्याच्या कामात कंपनीने गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही .

दगड गोटे हे ब्लास्टींग करुन काढण्यात येत नसुन ब्रेकरने काढण्यात येत आहे. कंत्राटदाराने रॉयल्टीकरीता आगाऊ रकमेचा भरणा केलेला असुन त्यापेक्षा कमी मालाची उचल अद्यापपर्यंत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

गिट्टी क्रशरसाठी काढण्यात येणाऱ्या मालामुळे मजुर किंवा शेतकरी यांचे तसेच शेतातील पिके उध्वस्त झाल्याचे एकही निवेदन राष्ट्रीय महामार्ग कार्यालयास प्राप्त झाले नाही.

(३) हे खरे नाही.

आष्टी-पांचाळा या रस्त्याच्या मालवाहतुकीच्या क्षमतेस अनुसरुन कंत्राटदार मालवाहतुक करत आहे. हा रस्ता कंत्राटदार स्वखर्चाने देखभाल दुरुस्ती करीत असुन सद्य:स्थितीत वाहतुकीस योग्य आहे.

(४) हे खरे नाही.

या प्रकल्पामध्ये करारनाम्यानुसार मंजूर वावाप्रमाणे काम करण्यात येत आहे. तळेगाव, आष्टी या गावा जवळ रस्ता दुपदरी पेव्हड शोल्डर सर्विसलेनसह करणे असा वाव आहे. वनक्षेत्रामधील लांबीमध्ये डांबरीकरणाऱ्या आणि उरलेल्या लांबी मध्ये दुपदरी पेव्हड शोल्डरसह रस्ता असा वाव आहे. लेंडी नदीवरील पुलाचे काम प्राधिकृत अभियंता यांनी मंजुर केलेल्या डिझाईन प्रमाणे करण्यात येत असुन या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झाल्याचे आढळुन आले नाही.

(५) काम गुणवत्तेनुसार व मंजूर वावानुसार होत असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खार आंबोली व तेलगडे (ता.मुरुड, जि.रायगड) या गावांजवळ सुरु असलेले ब्लास्टिंग बंद करण्याबाबत**

**(३९) १३११३ (१०-०८-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खार आंबोली व तेलगडे (ता.मुरुड, जि.रायगड) या दोन गावांना लागून असलेल्या खारभूमी विकास बंधाऱ्याच्या सुरू असलेल्या कामासाठी मागील काही महिन्यांपासून या गावाजवळ बेकायदेशीररित्या अहोरात्र ब्लास्टिंग सुरू असल्याने गावातील एक हजारहून अधिक घरांना तडे जाऊन घरे जमीनदोस्त झाली असून ध्वनी प्रदूषणामुळे ग्रामस्थांना असह्य त्रास सहन करावा लागत असल्याचे तसेच पर्यावरणालाही गंभीर धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बेकायदेशीररीत्या सुरु असलेले ब्लास्टिंगचे काम तात्काळ थांबविण्यात यावे याबाबतचे निवेदन ग्रामस्थांनी तहसीलदार, मुरुड व जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये व तत्पूर्वी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू बेकायदेशीररीत्या सुरु असलेले ब्लास्टिंगचे काम बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०९-२०२०) :** (१), (२) व (३) खारआंबोली खारभूमी बंधारा हा खारआंबोली व तेलवडे या दोन गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमीनीचे समुद्रखाडीच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण मिळण्यासाठी जलसंपदा (खारभूमी) विभागामार्फत कंत्राटदाराकडून बांधण्यात येत आहे. मौजे तेलवडे येथील स.नं.१४०/१ब/२ जमीनीमधून विनापरवानगी ब्लॉस्टिंग तसेच उत्खनन करुन सदर गौण खनिज कंत्राटदाराने सदर बंधाऱ्याच्या बांधकामासाठी वापरले आहे. तथापि, ब्लास्टिंग व उत्खननामुळे दोन्ही गावातील कोणत्याही घरांना तडे गेल्याची वा घरे जमीनदोस्त झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

सदरहू बेकायदेशीररीत्या सुरु असलेले ब्लास्टिंग त्वरीत थांबविण्यात यावे अशा मागणीचे एक निवेदन ग्रामस्थांनी तहसिलदार, मुरुड यांना माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये दिले आहे.

सदर बंधाऱ्याच्या कामासाठी कंत्राटदाराने गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत उप अभियंता, खारभूमी उपविभाग, मुरुड यांनी सदर कंत्राटदाराच्या देयकातून रु.४७,१४,९६६/- इतकी रक्कम स्वामीत्वधनापोटी शासनजमा केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हातील रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थींना अनुदान मिळण्याबाबत**

**(४०) १३२०५ (१५-०७-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील रमाई योजनेतील सन २०१८-१९ च्या ८५६६ लाभार्थींना पावसाळा सुरु होऊन देखील अनुदानाचा दुसरा, तिसरा व चौथ्या हप्त्याचे अनुदान मिळाले नसल्याने, अनेक गोर-गरिबांना घराविना पावसाळ्यात दिवस काढावे लागणार असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय पातळीवर निधी पंचायत समितीला वर्ग होत नसल्याने अर्धवट घरकूलांबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रमाई योजनेअंतर्गत घरकुलाचे उर्वरीत अनुदान लाभार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. धनंजय मुंडे (११-०८-२०२०) :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील रमाई आवास योजना सन २०१८-१९ च्या मंजूर ८७४१ लाभार्थ्यांपैकी द्वितीय हप्ता ६८७१ लाभार्थी, तृतीय हप्ता ४५५६ लाभार्थी व चौथा हप्ता ५२१ लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे.
(२) व (३) शासन स्तरावर रमाई आवास योजना (ग्रामीण) करीता सन २०२०-२१ मध्ये रू.५००.०० कोटी व रमाई आवास योजना (शहरी) करीता रू.१००.०० कोटी असा एकूण रू. ६००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. उपरोक्त निधी वित्त विभागाकडून उपलब्ध करून घ्यावयाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या समुद्र किनारी असलेल्या गावांच्या लोकवस्तीमध्ये लाटांचे पाणी आत शिरुन होत असलेले नुकसान

**(४१) १३३०८ (१७-०७-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे वेळणेश्वर, साखरी आगर, कोंडकारुळ, बुधल, अंजनवेल, तवसाळ (ता.गुहागर) आदी गावांत गत ३ वर्षांपासून वारंवार लाटांचे पाणी लोकवस्तीत शिरल्याने घरे व नारळी पोफळीच्या बागांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून येथील रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीने बांधलेल्या ब्रेकवॉटर वॉलमुळे लाटांची उंची वाढली असून त्यामुळे पाणी लोकवस्तीत शिरते असे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ तसेच दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार करून चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांचेमार्फत अभ्यास होवून त्यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या अहवालात ब्रेकवॉटर वॉलमुळेच लाटांची उंची वाढून पाणी लोकवस्तीमध्ये

जात असल्याचा निष्कर्ष काढला आहे, तसेच दिनांक १३ ते १७ जुलै, २०१८ च्या कालावधीत लोकवस्तीत शिरलेले पाणी हे ब्रेकवॉटर वॉलमुळेच शिरले आहे कि कसे याचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून अधिकची माहिती आवश्यक असल्यामुळे व्यवस्थापक,जे.एस.डब्ल्यु.जयगड यांचेकडून प्राप्त माहिती केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांनी सदर माहिती अपुरी असून पुन्हा अधिकची माहिती पाठविण्याबाबत कळविले आहे, त्यास अनुसरुन मागविण्यात आलेली अधिकची माहिती जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून दिनांक १७ जुन, २०२० रोजी वा त्या सुमारास प्राप्त झाली असुन सदर माहिती पत्तन अभियंता, रत्नागिरी यांचे दिनांक १९ जुन, २०२० रोजीच्या पत्रान्वये केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस), खडकवासला, पुणे यांना पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (सीड्ब्लुपीआरएस),खडकवासला, पुणे यांनी सखोल अभ्यास करून कोणते निष्कर्ष काढले आहेत व तद्नुसार सदर कंपनीविरोधात व याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०८-२०२०) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२ ), (३) व (४) होय.

(५) केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांनी त्यांचे दि.९.७.२०२० चे पत्रान्वये Shoreline Evaluation Studies ही अधिकची माहिती आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यानुसार जे.एस.डब्ल्यु. जयगड यांचेकडून दि.१४.७.२०२० चे पत्रान्वये सदर माहिती मागविण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदा, (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे मढेवडगाव ते चिंभळा हा रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला असल्याबाबत

**(४२) १३३२४ (१७-०७-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा, (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे मढेवडगाव ते चिंभळा या रस्त्याची दूरवस्था झाली असून रहदारीकरीता अयोग्य असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२६-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे द्विवार्षिक देखभाल-दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत रूग्णांना उपचारार्थ मिळणाऱ्या निधीची मर्यादा वाढविणेबाबत

**(४३) १३३३६ (१७-०७-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रूपये १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या केशरी कार्ड धारक कुटुंबांना वैद्यकीय उपचारासाठी महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत रूपये १ लाख ५० हजारांचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील कर्करोग, मधुमेह, किडणी, हृदयविकार, इत्यादी आजारांच्या रूग्णांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत असून या आजारावरील उचाराचा खर्च हा महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेतर्गत मिळणाऱ्या निधीपेक्षा अधिक असल्याने गरीब रूग्णांना या आजारावर उक्त योजनेतंर्गत उपचार घेणे शक्य होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरजू रूग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार वेळीच मिळणेकरिता शासनाने महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेतील निधीची मर्यादा वाढविणे आवश्यक असून त्यानुषंगाने शासन या योजनेतील निधीची मर्यादा ३ ते ४ लाख रूपयांपर्यत वाढविण्याचा निर्णय घेणार आहे काय,
(४) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेतंर्गत मिळणा-या निधीची मर्यादा वाढविणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०२-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.
महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत रुपये १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या केशरी, पिवळी, अंत्योदय, अन्नपूर्णा कार्ड धारक कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये १ लाख ५० हजार इतकी विमा मर्यादा असून मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा प्रति कुटुंब प्रति वर्ष रूपये २.५ लाख आहे.
(२) हे खरे नाही.

(३) अशा प्रकारची कोणतीही बाब विचाराधीन नाही. तथापि, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत Socio- Economic Cast Census(SECC-२०११) नुसार राज्यात ८३.७२ लाख लाभार्थी कुटुंबे असून या कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लक्ष रूपयापर्यंत उपचार अनुज्ञेय आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटणे फाटा (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे ट्रॉमा केयर सेंटर उभारणेबाबत**

**(४४) १३३५७ (१७-०७-२०२०). श्री.राजेश पाटील (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटणे फाटा (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) हे वेंगुर्ला-बेळगाव या राज्यमार्गावरील तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण असून या मार्गावर वाहन अपघाताचे प्रमाण वाढले असून अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून पाटणे फाटा येथे शासनाने ५० खाटांचे ट्रॉमा केयर सेंटर ची स्थापना करणेकरीता सन २०१३ साली मान्यता देण्यात आलेली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून मान्यता देण्यात आलेली असतानाही पाटणे फाटा येथील ट्रॉमा केयर सेंटर ची स्थापना आजतागायत झालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून मंजूर झालेल्या पाटणे फाटा येथील ट्रॉमा केयर सेंटरची स्थापना करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०४-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१७ जानेवारी २०१३ नुसार पाटणे फाटा, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे ५० खाटांचे ०१ उपजिल्हा रुग्णालय आणि ०१ ट्रामा केअर सेटर मंजूर करण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) पाटणे फाटा येथे अद्याप जागा उपलब्ध न झाल्याने बांधकाम झालेले नाही. जागा मिळविण्यासाठी जिल्हास्तरावर प्रयत्न सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक कार्यक्षेत्रातील प्लॉट एम-३ मधील गॅलेक्सी सरफॅक्टटंट कंपनीमध्ये झालेला स्फोट**

**(४५) १३४७९ (१४-०७-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक कार्यक्षेत्रातील प्लॉट एम-३ मधील गॅलेक्सी

सरफॅक्टटंट कंपनीमध्ये दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास स्फोट झाल्याने दोन कामगारांचा मृत्यू व एक कामगार गंभीर जखमी झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-०८-२०२०) :** (१) व (२) होय खरे आहे.

मे. गॅलेक्सी सरफॅक्टंटट लि. या कारखान्यामध्ये दि.१३ एप्रिल, २०२० रोजी झालेल्या स्फोटामध्ये ३ कामगारांचा मृत्यू झाला असून २ कामगार किरकोळ जखमी झाले होते.

सदर प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई व पोलिस विभागाने चौकशी केलेली आहे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

• सदर कारखान्यात ज्या हायड्रोजन पेराऑक्साईडच्या टँकचा स्फोट झाला त्या टँकमधुन रियॅक्टरला जाणाऱ्या पाईपलाईनला नॉन रिटर्न व्हॉल्व्ह (NRV) बसविण्यात आला नव्हता.

• रियॅक्टरचे तापमान वाढल्यानंतर तसेच कुलींग टॉवरचे पाणी पाईपलाईनमधून वितरीत होण्याचे बंद झाल्यानंतर ते सुचित करण्याकरीता Audio Visual Alarm ची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.

• हायड्रोजन पॅरऑक्साईड टँकला स्टेनलेस स्टिल ऐवजी माईल्ड स्टिलची फ्लेंज बसविण्यात आली होती.

• टँकच्या व्हेंटलाईन मधून फोम व फ्युम्सची गळती होत असतांना ऑपरेटर व्दारे टँकचा व्हेंटलाईन वॉल्व्ह बंद करुन घेणे अशा प्रकारची काम करण्याची पध्दत कामगारांच्या सुरक्षा व आरोग्याच्या दृष्टीने योग्य नसल्याचे निदर्शनास आले.

याकरीता कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात फौजदारी खटला (क्र. ५२१६/२०२०) दाखल करण्यात आलेला आहे. तसेच एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन बोईसर यांनी कारखान्याचे व्यवस्थापकाविरुध्द भा.दं.वि.च्या विविध कलमान्वये दिनांक १२.०५.२०२० रोजी क्रमांक ०१६९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

भोगवटादाराने मृत कामगारांच्या वारसांकरीता खालील प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम मा. श्रमीक नुकसान भरपाई आयुक्त यांच्या कार्यालयात जमा केलेली आहे.

| अ.क्र. | कामगाराचे नांव | नुकसान भरपाईची रक्कम |
|---|---|---|
| १ | रुणाल प्रभाकर राऊत | १५,१२,४५०/- |
| २ | शमीर सद्दीन खोजा | ११,९८,५००/- |
| ३ | विजय पांडुरंग सावंत | १३,१६,५५०/- |

या व्यतीरिक्त व्यवस्थापनाने प्रत्येक मृत कामगारांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ११.०० लक्ष या प्रमाणे एकूण रुपये ३३ लक्ष इतके सानुग्रह अनुदान दिलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील अमृत आहार योजना बंद केल्यामुळे देहरे ग्रामपंचायत मधील आदिवासी महिलेने मुली सह केलेली आत्महत्या

**(४६) १३६९१ (१९-०७-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी बहुल जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) देहरे ग्रामपंचायत येथील माळ या गावातील मंगला दिलीप वाघ वय ३० या आदिवासी महिलेने तिची मुलगी रोशनी वाघ हिचा गळा दाबून हत्या केली तसेच स्वतः ही गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि. २३ जून २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी गरिबी व लॉकडाऊनमुळे वीटभट्टी बंद असल्याने तसेच शासनाची "अमृत आहार योजना" बंद केल्यामुळे, गर्भवती महिला स्तनदा माता व लहान मुले यांना देण्यात येणारा पौष्टिक आहार न मिळाल्याने, तसेच अत्यंत गरीब परिस्थितीमुळे आणि उपजीविकेचे कोणतेही साधन आदिवासींना उपलब्ध नसल्याने सदरहु दुःखद घटना घडल्याची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांचेकडे ई-मेल पत्राद्वारे उपरोक्त घटनेबाबत दिनांक ६ जुलै, २०२० रोजी सविस्तर निवेदनही पाठविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तसेच लोकप्रतिनिधीनी पाठविलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, बंद असलेली "अमृत आहार योजना" पुनः सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०७-०८-२०२०) :**(१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) कडव्याची माळी, ग्राम पंचायत देहेरे येथे दि.२३.०६.२०२० रोजी श्रीमती मंगला दिलीप वाघ अंदाजे वय ३० आणि तिची मुलगी रोशनी दिलीप वाघ वय वर्ष २ या दोघी झाडाला गळफास लावून मृत्यु झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.
(२), (३), (४) व (५) अनुसुचित क्षेत्रात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमार्फत गरोदर स्त्रीया व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार, तसेच ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील शाकाहारी बालकांना प्रतिदिन २ केळी व मांसाहारी बालकांना

प्रतिदिन १ उकडलेले अंडे आठवड्यातून ४ वेळा अतिरिक्त आहार पुरविण्यात येत आहे.

कोविड-१९ विषाणुमुळे उद्भविलेल्या परिस्थितीमध्ये शासनाने दि.३१.०३.२०२० च्या शासन निर्णयान्वये गरम ताजा आहाराचा घरपोच डबा लाभार्थ्यांना पोहचविणे, ज्या ठिकाणी शिजवून आहार लाभार्थ्यांना पोहोच करणे शक्य नसेल तेथे अन्न घटकाचे पॅकेट वितरित करणे, बालकांना घरपोच अंडी/केळी वितरित करणे तसेच ज्या ठिकाणी शक्य नसल्यास अशा परिस्थितीत लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम थेट वितरित करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

घटनेमधील बालिकेला घरपोच कच्चे धान्ये आणि अमृत आहार योजनेमधील देय आहार वाटप करण्यात आला होता. संबंधित महिला या अमृत आहार योजनेच्या लाभार्थी नव्हत्या.

सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून पालघर जिल्हयामधील आदिवासी व अनुसुचित क्षेत्रामध्ये अमृत आहार योजना सुरु आहे. कोविड-१९ विषाणूच्या साथीमुळे चौरस आहार शिजवून न देता कच्च्या धान्याच्या स्वरुपात लाभार्थ्यांना आहार देण्यात येत आहे.

---

## शेंद्रे (जि.सातारा) ते देहूरोड (जि.पुणे) पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत

**(४७) १३७९० (१७-०७-२०२०). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंद्रे (जि.सातारा) ते देहूरोड (जि.पुणे) पर्यंतच्या सहा पदरीकरणाच्या कामाचे सुमारे दहा कोटी रुपयाचे कंत्राट रिलायन्स इन्फ्रा कंपनीला दिलेले असून कंपनीने या कामासाठी पुन्हा उप ठेकेदार निवडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीची कामे संथगतीने सुरु असुन उप ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात येत आहेत, त्याचबरोबर वेळे, नसरापुर, शिंदेवाडी याठिकाणांची उड्डाणपुलाची कामे रखडलेली असतानांही त्याची देयके काढणे, तसेच जादा रक्कमेचे देयक काढल्याच्या तक्रारीही आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठेकेदारांकडून महामार्गाच्या सहा पदरीकरणांची कामे ठिकठिकाणी खोळंबलेली असुन राष्ट्रीय महामार्गावर रिलायन्स इंफ्रा कंपनीकडून सुविधाही पुरवल्या जात नसल्याने प्रवास हा धोकादायक व गैरसोयीचा होत आहे, टोल देऊनही खड्डयांच्या रस्त्यातून प्रवास करावा लागत असल्यामुळे प्रवाशांमध्ये असंतोष निर्माण होऊन याविरोधात तीन -चार महिन्यापासून आंदोलन सुरु असुन वारंवार तक्रारी करून सुद्धा रिलायन्स आणि प्राधिकरणाच्या अधिका-यांवर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने या संपुर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधित कंपनी, ठेकेदार व त्यांना सहाय्य करणा-या

दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०८-२०२०) :**(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.०४ चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितीतील असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

पुणे-सातारा रा.म.०४ कि.मी.७२५.०० ते कि.मी.८६५.३५० या रस्त्याचे काम मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारास NHDP Phase -V अंतर्गत DBFOT (Design, Build, Finance, Operate & Transfer) तत्वावर देण्यात आले असून सदर प्रकल्पाची एकूण किंमत रु.१७२४.५५ कोटी इतकी असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे. तसेच उप कंत्राटदाराची नेमणूक करण्यात तसेच मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारामार्फत देय असलेली रक्कम ठरविण्यात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कोणतीही भूमिका बजावत नाही,असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(२) सदर प्रोजेक्ट मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लि.या कंत्राटदारास DBFOT तत्वावर देण्यात आले असल्यामुळे कामाची सर्व जबाबदारी कंत्राटदारास देण्यात आली आहे,असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

या प्रकल्पासाठी नियुक्त केलेले स्वतंत्र अभियंता वेळोवेळी कामाचे गुणात्मकपणे निरीक्षण करतात आणि तेथे असलेल्या कमतरतांबाबत सवलतकारास सूचित करतात. सवलतकारास त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. सवलतकारामार्फत वेळू येथील भुयारीमार्ग पूर्ण करण्यात आला असून वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे. नसरापूर येथील उड्डाणपूलावरील उजव्या बाजूचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूकीसाठी खुले करण्यात आले आहे. तसेच डाव्या बाजूचे काम प्रगतीपथावर आहे. सवलतकाराने काही अडचणींमुळे सातारा जिल्हयातील शिंदेवाडी उड्डाणपुलाचे काम सुरु केले नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.प्रकल्पाच्या स्वतंत्र अभियंताने दिलेल्या माहितीनुसार प्रकल्पातील तांत्रिक तपशीलवार आवश्यकतानुसार काम केले जात आहे आणि सवलतीच्या कराराच्या तरतुदीनुसार कामाची गुणवत्ता नियमितपणे तपासली जात आहे.

(३) गतवर्षीच्या पावसाळयात मुसळधार पाऊस पडल्यामुळे काही ठिकाणी खड्डे व खडबडीत झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी काही तक्रारी लोकांकडून प्राप्त झाल्या आहेत.

प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने कंत्राटदार मेसर्स पुणे सातारा टोल रोड प्रायव्हेट लिमिटेड (पीआरटीपीएल) यांना रस्ता रहदारीच्या स्थितीत ठेवण्यासाठी निर्देश दिले आहेत.

ऑक्टोबर २०१९ पर्यंतच्या अत्यंत तीव्र आणि प्रदीर्घ पावसाळयात महामार्ग आणि सेवा वळण रस्त्यांची अवस्था खालीवली. तथापि, कंत्राटदाराने ऑक्टोबर २०१९ मध्ये देखभाल दुरुस्तीचे काम सुरु केले आणि जाने.२०२० पर्यंत संपूर्ण प्रकल्प महामार्ग खड्डेमुक्त करण्यात आला. वळण रस्ते बिटुमिनस लेयर्ससह पुन्हा तयार करण्यात आले आहेत. परंतु देशात

लॉकडाऊन असल्याने देखभाल-दुरुस्ती व मुख्य बांधकाम कामावर परिणाम झाला. तथापि, केंद्र/ राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २० एप्रिल २०२० पासून हे काम पुन्हा सुरु झाले असून मर्यादित हालचालींमुळे कमी वेगाने सुरु आहे. देखभाल ही एक सततची क्रिया असून रस्ता वापरकर्त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी कंत्राटदारास लवकरात लवकर कामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एक कोटी विद्यार्थी मध्यान्ह भोजनापासून वंचित राहिल्याबद्दल**

**(४८) १४००६ (१८-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ८६ हजार पूर्व व उच्च प्राथमिक शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या १ कोटी, ३ लाख विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत मध्यान्ह भोजन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी येणाऱ्या खर्चात केंद्राचा हिस्सा ६० टक्के तर राज्याचा हिस्सा ४० टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर्षी कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने मे व जून या सुट्टीच्या महिन्यातही विद्यार्थ्यांना कोरडे धान्य देण्याचे आदेश देऊन केंद्र शासनाने आपल्या हिश्श्याची रक्कम म्हणून सुमारे २५६६ कोटी रुपये व १२.२३ लाख मेट्रिक टन धान्य राज्य शासनाकडे पाठविले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विद्यार्थ्यांना या अन्नधान्याचे वाटपच झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, धान्य वाटप न होण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांना सत्वर धान्य वाटप करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने दि.१८ जून, २०२० रोजीच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत

रु.१४९.६४ कोटी इतका केंद्र हिस्सा मंजूर केला आहे.
(४), (५) व (६) जिल्हानिहाय ई-निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त होणाऱ्या पुरवठेदारामार्फत विद्यार्थ्यांना प्रि-पॅक स्वरुपात कोरडा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नियुक्त पुरवठेदारामार्फत तांदूळ व धान्यादी मालाचा शाळास्तरावर पुरवठा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना साखर कारखानदारांकडून ऊसाचे देयके अदा केले नसल्याबाबत**

**(४९) १४०३६ (१८-०७-२०२०). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील काही साखर कारखान्यांना ऊस गाळपासाठी परवाना देण्यात आला असून मागील हंगामात साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी केला पण हमी भावाप्रमाणे व शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे शेतकऱ्यांना उसाचे देयक अदा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांचा ऊस घेतल्यानंतर त्यांना १४ दिवसात रास्त आणि किफायतशीर भाव (एफआरपी) साखर कारखान्यांनी देणे बंधनकारक असून त्याचे पालन न करणाऱ्या कारखान्यांना थकबाकीदार ठरवून त्यांच्यावर महसूल वसुली प्रमाणपत्र (आर.आर.सी.) नोटिसा देऊन कारवाई केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गतवर्षी तत्कालीन शासनाने कठोर भूमिका घेतल्यामुळे शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे पैसे न देणाऱ्या ७१ साखर कारखान्यांवर आर.सी.सी.ची कारवाई केल्यानंतर सर्व कारखान्यांनी शेतकऱ्यांचे पैसे दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर्षी नवीन गळीत हंगाम सुरू होण्याची वेळ आली तरी देखील राज्यातील ३७ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे एफ.आर.पी. चे सुमारे ३५८ कोटी रुपये दिले नसल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काने पैसे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३१-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. गळीत हंगाम २०१९-२० मध्ये राज्यात १४४ कारखाने सुरु होते . या हंगामात एकूण ५५०.१३ लाख मे. टन ऊसाचे गाळप झालेले आहे. सदर गाळप ऊसाचे नियमानुसार देय FRP रू.१३७९०.२५ कोटी ऊस किंमत होती. त्यापैकी कारखान्यांनी ऊस पुरवठादारांना रू.१३५९६.७३ कोटी रक्कम म्हणजेच ९८.६०% रक्कम अदा केली असून दि.१५/०७/२०२० अखेर २६ कारखान्यांकडे

नियमानुसार रू.१९३.५२ कोटी रक्कम थकित आहे.

(२) होय. उस नियंत्रण आदेश, १९६६ चे कलम ३(३) च्या तरतुदीनुसार FRP ची अदायगी १४ दिवसात करणे बंधनकारक आहे. तसेच त्याचे पालन न करणाऱ्या कारखान्यांवर RRC कारवाई करण्याची कलम ३(३A) ची तरतूद आहे.

(३) हंगाम २०१८-१९ मध्ये थकीत FRP संदर्भात ७८ कारखान्यांवर रु.२३२५.५८ कोटी रक्कमेची RRC कारवाई करण्यात आली होती. त्यापैकी ६३ कारखान्यांकडून रु.२१९७.७४ कोटी रक्कम वसूल करण्यात आली असून दि.१५/०७/२०२० अखेर १५ कारखान्यांकडे रु.१२७.८४ कोटी प्रलंबित आहेत.

(४) हंगाम २०१९-२० मधील १४४ कारखान्यापैकी २६ कारखान्यांकडे दि.१५/०७/२०२० अखेर नियमानुसार रु.१९३.५२ कोटी थकीत आहे.

(५) दि.१५/०७/२०२० अखेर २६ कारखान्यांकडे FRP रक्कम रु.१९३.५२ कोटी प्रलंबित आहे. त्यापैकी दि.२०/०७/२०२० रोजी युटेक शुगर लि., जि.अहमदनगर या कारखान्यावर RRC कारवाई करण्यात आली असून उर्वरीत थकबाकीदार कारखान्यांकडे FRP सत्वर अदायगीबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

## महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने शेतकऱ्यांना कापसाचे चुकारे अदा करण्याबाबत

**(५०) १४०८९ (१३-०८-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सीसीआयच्या ८१ कापूस खरेदी केंद्रांवर कापूस विकलेल्या शेकडो शेतकऱ्यांचे कोरोनामुळे चुकारे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने शेतकऱ्यांचा एकूण २,५६० कोटी रुपयांचा ५० लाख क्विंटल इतका कापूस खरेदी केला असून, त्यातील १,८७८ कोटी रुपयांचे चुकारे अदा केले आहेत व त्यापैकी ६८२ कोटी रुपयांचे चुकारे थकविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना सारख्या परिस्थितीमध्ये कापूस विकलेल्या शेतकऱ्यांचे चुकारे प्रलंबित राहिल्यामुळे त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कापूस विकलेल्या शेतकऱ्यांना त्यांचे चुकारे लवकरात लवकर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३१-०८-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता सीसीआय यांच्या एकूण ८६ खरेदी केंद्रावर मे २०२०

अखेर ४,०५,१८० शेतकऱ्याकडून रुपये ५,७८५ कोटी इतक्या मुल्याचा ११४.९८ क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे.त्यापैकी मे २०२० अखेर एकूण रुपये ५४४१.५१ कोटींची चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली असून उर्वरित रुपये.३४३.८८ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सीसीआय मार्फत चालू होती.

तसेच, कापूस पणन महासंघ द्वारे मे २०२० अखेर एकूण २.६० लक्ष शेतकऱ्याकडून रुपये ३६६७ कोटी मूल्याचे ६८.५५ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली होती.त्यापैकी रुपये ३०५९.७८ कोटी इतक्या रकमेचे चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर महासंघ द्वारे वर्ग करण्यात आलेले असून उर्वरित रुपये. ९०७.२२ कोटी इतक्या रकमेची चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही महासंघ द्वारे चालू होती.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक ५ ऑगस्ट २०२० अखेर सीसीआय द्वारे एकूण ५,३१,७६४ शेतकऱ्यांकडून रुपये ६९५४.९७ कोटी किमतीच्या मूल्याचे एकूण १२८.११ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली असून त्यापैकी रुपये ६९०३.३५ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली असून उर्वरित रक्कम रुपये ५१.६२ कोटी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सीसीआय मार्फत चालू आहे.

तर दिनांक ५ ऑगस्ट २०२० अखेर महासंघ द्वारे एकूण ३,४३३४१ शेतकऱ्यांकडून रुपये ४,९२२.५४ कोटी इतक्या मूल्याचे ९३.६८ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली असून त्यापैकी रुपये४,२९४.८८कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली असून उर्वरित रक्कम रुपये ६२७.६६ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही महासंघ द्वारे प्रगतीपथावर आहे.

(३) नाही.

सीसीआय व कापूस पणन महासंघ द्वारे उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर येत्या आठ दिवसात जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल,असे सीसीआय व महासंघाने स्पष्ट केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.